www.rajdand.com
पुणे, मंगळवार
28.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । फाल्गुन शु.९
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९



**काश्मिरी अतिरेकी पाकिस्तानात ठार: हल्लेखोरांनी खालिद रझाला गोळ्या घातल्या**

पान ४ वर..

# ईशान्येकडील तीन राज्यांचे एक्झिट पोल जाहीर

## त्रिपुरा - नागालँडमध्ये भाजप युतीला बहुमत, मेघालयमध्ये त्रिशंकू विधानसभेचा अंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


**ईशान्येतील तीन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले आहे. त्रिपुरामध्ये १६ फेब्रुवारीला आणि मेघालय-नागालँडमध्ये २७ फेब्रुवारीला मतदान झाले. मतदानानंतर सोमवारी संध्याकाळी समोर आलेल्या एक्झिट पोलमध्ये त्रिपुरामध्ये भाजप आघाडीला बहुमताचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मेघालयात कोणालाही स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता नाही. दुसरीकडे नागालँडमध्ये भाजप युती पुन्हा सत्तेत येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

इंडिया टुडे- ॲक्सिस माय इंडिया, झी न्यूज-मेट्रीस आणि न्यूज १८-सी मतदारांनी सोमवारी मतदान संपल्यानंतर एक्झिट पोल जारी केले. ईशान्येतील तीनही राज्यांमध्ये २ मार्च रोजी मतमोजणी होणार आहे. १८ जानेवारी रोजी निवडणूक आयोगाने ईशान्य त्रिपुरा, मेघालय आणि नागालँड या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर केल्या. १६ आणि २७ फेब्रुवारी रोजी तिन्ही राज्यांमध्ये मतदान झाले.

१६ फेब्रुवारी रोजी झालेल्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत सुमारे ८६.१०% मतदान झाले होते. यापूर्वी २०१८ मध्ये त्रिपुरामध्ये ९०% मतदान झाले होते आणि भाजपने सरकार स्थापन केले होते. यावेळी मतदानाचा आकडा ४% कमी आहे. यावेळी राज्यात एकूण ३,३३७ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. या निवडणुकीत २८.१३ लाख मतदारांनी २५९ उमेदवारांचे भवितव्य ठरवले.

यापूर्वी २०१८ मध्ये ५९ जागांवर निवडणूक झाली होती. ३५ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. यासह भाजपने डाव्यांचा २५ वर्षांचा बालेकिल्ला उद्ध्वस्त केला. पक्षाने बिप्लब देव यांना मुख्यमंत्री केले, परंतु मे २०२२ मध्ये माणिक साहा यांना मुख्यमंत्री केले.

मेघालयात २७ फेब्रुवारीला सायंकाळी ५ वाजेपर्यंत ७४.३२ टक्के मतदान झाले. येथील ६० पैकी ५९ जागांवर मतदान झाले. सोह्योंग जागेवरील णृझ उमेदवार कॄ.ठ. लिंगडोह यांच्या निधनानंतर येथील निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. राज्यात एकूण ३० लाख मतदार आहेत. ३३९ पुरुष आणि ३६ महिला असे एकूण ३७५ उमेदवार रिंगणात आहेत. यासाठी १२ जिल्ह्यांमध्ये ३,४१९ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. येथे एनपीपीने ५७, काँग्रेस आणि भाजपने ६०-६० आणि टीएमसीने ५६ जागांसाठी उमेदवार उभे केले.




मेघालयात २०१८ मध्ये ५९ जागांवर निवडणूक झाली. काँग्रेसला सर्वाधिक २१ जागा मिळाल्या होत्या. भाजपला येथे केवळ २ जागा मिळू शकल्या. नॅशनल पीपल्स पार्टीला (एनपीईपी) १९ जागा मिळाल्या. पीडीएफ आणि एचएसपीडीपीने मिळून सरकार स्थापन केले. त्यांनी मेघालय डेमोक्रेटिक अलायन्स (चृअ) ची स्थापना केली.

नागालँडमधील १६ जिल्ह्यांतील ६० पैकी ५९ विधानसभा जागांसाठी २७ फेब्रुवारी रोजी मतदान झाले होते. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ८३ टक्के मतदान झाले होते. येथे १० फेब्रुवारी रोजी अकुलुटो विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस उमेदवार खेकाशे सुमी यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला, त्यानंतर भाजपचे उमेदवार काजेतो किनीमी यांची बिनविरोध निवड झाली. राज्यात एकूण १३ लाख मतदार आहेत. त्याचवेळी १८३ उमेदवार रिंगणात असून त्यात ४ महिला आणि १९ अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी २,३१५ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती.

नागालँडमध्ये सध्या नॅशनल डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीची सत्ता आहे. नेफियू रिओ हे मुख्यमंत्री आहेत. छूझझ २०१७ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर एनडीपीपीने १८ तर भाजपने १२ जागा जिंकल्या. निवडणुकीपूर्वी दोन्ही पक्षांनी युती केली होती. सरकारमध्ये छूझझ, इगझ छझझ आणि गृण यांचा समावेश आहे.

## शेतकऱ्यांसाठी खुशखबर! आज पीएम किसानचा तेरावा हफ्ता होणार जमा

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक महत्वाची बातमी आहे. ती म्हणजे आज (२७ फेब्रुवारी) पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा तेरावा हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तेरावा हफ्ता शेतकऱ्यांना कधी मिळणार याची प्रतिक्षा होती. अखेर आज पीएम किसान योजनेचा तेरावा हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. दरम्यान, सर्व कागदपंत्राची पूर्तता करणारे आणि ज्यांचे आधार बँक खात्याला संलग्न आहे, त्याला या योजनेचा लाभ मिळणार आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. चार महिन्यांच्या अंतराने दोन दोन हजार रुपये करुन, ही रक्कम डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाते. आतापर्यंत १२ हफ्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. आज तेरावा हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे.

# रेल्वेत नोकरी लावण्याच्या आमिषाने फसवणूक, साताऱ्यात एकाला ठोकल्या बेड्या

**सातारा : प्रतिनिधी**

रेल्वेत नोकरी लावण्याच्या आमिषाने फसवणूक करणाऱ्या एका व्यक्तीला मुंबई पोलिसांनी साताऱ्यातून अटक केली आहे. संताराम सकपाळ ( वय, ५२ ) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. सकपाळ हा सातारा येथील रहिवासी असून तो रिअल इस्टेटचा व्यवसाय करतो. भारतीय रेल्वे आणि पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी देण्याच्या बहाण्याने सकपाळ याने १३ लोकांची १.५६ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

संताराम सकपाळ हा त्याच्या इतर चार साथीदारांसोबत भारतीय रेल्वे आणि पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी देतो, असे म्हणून फसणूक करत होते. हरिश्चंद्र कदम यांनी यासंदर्भात माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिस तपास सुरू होता. रविवारी या प्रकरणात सकपाळ याला अटक करण्यात आली. त्याच्याकडे अधिक तपास सुरू आहे. सकपाळच्या चौकशीतून या टोळीच्या मुळापर्यंत जाण्यास मदत होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी सकपाळसह चार जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला आणि सकपाळ याला बेड्या ठोकल्या. इतर चार जणांचा शोध सुरू आहे.

सकपाळ याने आपल्या चार साथीदारांच्या मदतीने सातारा, लातूरसह इतर जिल्ह्यातील १३ जणांची फसवणूक केली. नियुक्तीपत्रे देऊन एका उमेदवाराला प्रशिक्षणासाठी चेन्नईला पाठवल्याचे देखील तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काही रोख रक्कम सकपाळच्या खात्यात ट्रान्सफर करण्यात आली होती, त्या आधारे त्याला शोधून अटक करण्यात आली. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी एमआरए पोलिस अधिक तपास करत आहेत.

रल्वेत आणि पोस्टात नोकरी लावण्याच्या आमिषाने सकपाळ आणि त्याचे साथीदार तरूणांकडून पैसे घ्यायचे. रेल्वेतून मेल आल्याचे भासवून रेल्वेची बनावट नोकरीवर हजर होण्याची ऑर्डर द्यायचे. ऑर्डरवर बनावट सही करून, बनावट शिक्क्यांच्या वापर करून ती ऑर्डर खरी असल्याचे भासवून उमेदवारांना देण्यात येत होत्या. अनेक तरूणांना अशा ऑर्डर देखील देण्यात आल्या होत्या. ही ऑर्डर घेऊन काही तरूणांनी सकपाळ याने सांगितल्यानुसार भुसावळ येथे ट्रेनिंग सेंटरला दाखल झाले. परंतु, तेथे गेल्यानंतर ऑर्डर कॉपी बनावट असल्याचे समजताच तरुणांना धक्का बसला. त्यानंतर १३ जणांना चेन्नईला पाठवण्यात आले. तेथे गेल्यानंतर एका रेल्वेचे ट्रेनिंग सेंटर सांगून एका खासगी स्कॅनिंग सेंटरमध्ये एक महिना ट्रेनिंग पूर्ण करण्यास भाग पाडल्याचे फसवणूक झालेल्या तरुणांनी म्हटले आहे.

# मनीष सिसोदिया यांना ५ दिवसांची सीबीआय कोठडी

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

दिल्ली स्थित एका न्यायालयाने सोमवारी दिल्लीचे उप मुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना ५ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली. त्यामुळे आता ते ४ मार्चपर्यंत केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या ताब्यात राहतील. सिसोदियांना सोमवारी दुपारी ३.१० वा. राउज अव्हेन्यू कोर्टात सादर करण्यात आले होते. तिथे जवळपास ३० मिनिटे सुनावणी झाली. त्यात तपास संस्थेने सिसोदियांची ५ दिवसांची कोठडी मागितली. कोर्टाने ती मान्य केली.

सीबीआयने रविवारी सलग ८ तासांच्या चौकशीनंतर सिसोदिया यांना अटक केली. सिसोदिया तपासात सहकार्य करत नसल्याचा आरोप तपास संस्थेने केला आहे. सिसोदिया यांच्या अटकेनंतर आम आदमी पार्टी (आप) दिल्लीसह देशातील अनेक शहरांमध्ये निदर्शने करत आहे. नेते-कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. दिल्लीतील भाजप कार्यालयाचा घेराव करू, असे आपने म्हटले आहे.



जुलै २०२२ मध्ये दिल्लीचे नायब राज्यपाल व्हीके सक्सेना यांनी मनीष सिसोदिया यांच्या विरोधात सीबीआय चौकशीची मागणी केली. सक्सेना यांनी सिसोदिया यांनी नियमांकडे दुर्लक्ष करून भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. यानंतर ईडी आणि सीबीआयने सिसोदियाविरुद्ध तपास सुरू केला.

सीबीआयचे वकील कोर्टात म्हणाले, ''हे संपूर्ण प्रकरण प्रॉफिटचे आहे. आम्हाला याबाबत अधिक चौकशी करायची आहे. सिसोदिया हे उत्पादन शुल्क मंत्री आहेत आणि ते मंत्र्यांच्या गटाचे नेतृत्व करत होते. मद्य धोरणाच्या मॉडेलबद्दल कोणतीही चर्चा झाली नाही.''

सिसोदियाचे वकील दयान कृष्णन म्हणाले, ''एलजींनी मे २०२१ मध्ये पॉलिसीला ग्रीन सिग्नल दिला होता. नफ्याच्या मार्जिनबद्दलच्या सर्व वादविवादांना एलजींनी मान्यता दिली होती. त्यांनी बदलांना मान्यता दिली होती. पहिल्याच दिवशी सीबीआय फोनबद्दल बोलले. म्हणाले सिसोदिया यांनी ४ फोन वापरले, ३ नष्ट केले. सिसोदिया त्यांचा फोन सेकंड हँड दुकानात देऊ शकत नव्हते का.

दयान कृष्णन म्हणाले, ''सीबीआय म्हणत आहे की सिसोदिया त्यांना पाहिजे तसा प्रतिसाद देत नाहीत. तपासात सहकार्याचा प्रश्न आहे, सिसोदिया यांनी सहकार्य केले आहे. त्यांच्या घरावर छापे टाकण्यात आले. त्यांचे फोन एजन्सीकडे आहेत. आता एजन्सी म्हणत आहे की सिसोदिया टाळाटाळ करणारी उत्तरे देत आहेत. त्यांना हा अधिकार आहे. व्यक्तीला घटनात्मक अधिकार आहेत.

दरम्यान, दिल्लीत आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आज निदर्शने केली. त्यांची सुरक्षा दलांशी चकमकही झाली. यावेळी महिला कार्यकर्त्या आणि महिला पोलिसांमध्ये बाचाबाचीही झाली. आम आदमी पार्टी देशभरात निदर्शने करत आहे. पंजाब, मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेशमध्ये आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## मोटरसायकलच्या समोरासमोरील धडकेत एक ठार, दोन जखमी

**सातारा : प्रतिनिधी**

मोटरसायकलच्या समोरासमोरील धडकेत एक ठार, दोन जखमी झाल्याची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान बिजवडी, ता. माण गावच्या हद्दीत फलटण ते दहिवडी जाणाऱ्या रस्त्यावर रामचंद्र तात्याबा दडस रा. पांगरी, ता. माण हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एमएच ११ सीटी ६४९० घेऊन फलटण बाजूकडून दहिवडी कडे जात असताना राँग साईडला जाऊन समोरून येणाऱ्या अजय विठ्ठल शिंदे राहणार मुरूम तालुका बारामती जिल्हा पुणे यांच्या मोटरसायकल क्रमांक एमएच ४२ एइ ७६१४ हिस जोराची धडक देऊन झालेल्या अपघातामध्ये त्यांचा मृत्यू झाला असून अजय विठ्ठल शिंदे आणि दिपाली सोमनाथ शिंदे हे दोघेजण जखमी झाले आहे. या अपघाताची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार डी डी डोईफोडे करीत आहेत.

# सातारा पालिकेचे बजेट आज होणार सादर

**सातारा : प्रतिनिधी**



सातारा नगर पालिकेच्या इतिहासात सलग दुसऱ्या वर्षी प्रशासकीय राजवटीत सन २०२३/२४ या आर्थिक वर्षासाठी सादर करण्यात येणार आहे. हे बजेट ४५० कोटीचे असणार आहे. त्यामुळे आजपर्यंतचे हे सर्वात मोठे बजेट मानण्यात येत आहे. या अर्थसंकल्पात शहर व उपनगराच्या भागातील पायाभुत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात तरतुद करण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. हे बजेट पालिका कमिटी हॉलमध्ये दि. २८ रोजी सकाळी ११ वाजता मुख्याधिकारी अभिजीत बापट यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सादर करण्यात येणार आहे. हे बजेट कोणतीही करवाढ नसलेले तसेच दिलासा देणारे असावे, अशी अपेक्षा सातारकरांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

सातारा नगर पालिकेच्या अर्थसंकल्पाकडून शहरासह नव्याने हद्दीत आलेल्या नागरिकांच्या अपेक्षा वाढू लागल्या आहेत. या अर्थसंकल्पात वाढीव भागातील पायाभूत सेवा सुविधांसाठी भरघोस निधीची तरतूद करुन विकासाची गाडी गतीमान करण्यात यावी, अशी अपेक्षा उपनगरातील नागरिकांमधून होत आहे. गतवर्षी ४१० कोटींचे पालिकेचे बजेट होते. पण यावर्षी उपनगरातील हद्दवाढ भागातील विकासकामांचा विचार करुन जवळपास ४५० कोटींचे बजेट सादर होत आहे. साधारणपणे तीन ते चार तास हे बजेट सुरु असण्याचे संकेत मिळत आहेत.

आतापर्यंतचे मंजूर कामांची संख्या पाहिली तर ३०० ते ३५० कोटींपर्यतची आहे. त्याचबरोबर १०० कोटींची रककम शासनाकडून पालिकेत जमा झालेली आहे. त्यामुळे पालिकेचे बजेट सर्वात मोठं असणार आहे. हदद्वाढीची कामे प्रस्तावित आहेत. गतवर्षी योजना मंजूर झालेल्या आहेत. त्यानुसार गुरुवारपरच येथे दहा कोटीचे शॉपिंग सेंटर होत आहे. त्याशिवाय डीपीसीमध्ये काही कामांना मंजुरी मिळाली आहे. सातारा नगरपालिकेची प्रशासकीय इमारतीचे काम सुरु आहे. त्याचबरोबर पोवईनाका येथील शिवतिर्थचे काम होत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून ३०० घरे सुरु आहेत, असे एकूण १६५८ घरांची योजना आहे, त्याचे काम यावर्षाअखेरपर्यंत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा सातारकरांमधून व्यक्त होत आहे.

कासच्या ग्रॅव्हीटीवर सातारकरांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याबाबतची दरमंजुरी या उद्याच होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या दोन वर्षात म्हणजे २०२५ पर्यंत सातारकरांना कासचे पाणी पूर्ण क्षमतेने मिळणार आहे. गोडोली तळे सुशोभिकरणाबाबतची वर्कऑर्डर झाल्यामुळे त्याचे काम ही लवकरात लवकर सुरु होण्याचे संकेत मिळत आहेत. पोवईनाका येथील शिवतिर्थासाठी आठ कोटीचा निधी आलेला आहे. त्यामुळे त्याचे कामही पुढील वर्षाअखेरपर्यंत काम पूर्णत्वास जाणार आहे. एकूणच सातारा नगरपालिकेचे बजेट हे सातारकरांना दिलासा देणारे व सुखावणारे असावे, अशी अपेक्षा यानिमित्ताने सातारकर व्यक्त करत आहेत.

## पुणे-बेंगलोर महामार्गावर चेन स्नॅचिंग

**सातारा : प्रतिनिधी**

पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर चेन स्नॅचिंग झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २४ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास म्हसवे डी मार्ट ते सातारा जाणाऱ्या सर्विस रोड लगत राजश्री सुरेश जगदाळे राहणार म्हसवे, तालुका सातारा या महिलेच्या गळ्यातील तीस हजार रुपये किंमतीचे एक तोळा वजनाचे मंगळसूत्र पाठीमागून मोटरसायकल वरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून जबरदस्तीने चोरून नेले आहे. याबाबतची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास पोलीस हवालदार परिहार करीत आहेत.

# जवळवाडी गावचा सर्वांगीण विकास करणार - आ. शिवेंद्रराजे भोसले

**मेढा : प्रतिनिधी**

जवळवाडी गांवाच्या सर्वांगीन विकासासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आ. शिवेंद्रराजे भोसले यांनी दिले. येथील जलजीवन मिशन योजना व कोयना भूकंप पुनर्वसन योजनेतून मंजूर झालेल्या आरसीसी बंदीस्त गटर योजनेच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

जवळवाडी गावची स्वतंत्र पाण्याची योजना १ कोटी ८१ लाख ११ हजार ७०४ रुपये खर्च होऊन योजना कार्यरत केली जाणार आहे. त्यामुळे भविष्यातील ५० वर्षांचा पाण्याचा प्रश्न गावचा मिटणार आहे. जवळवाडी गाव जावली तालुक्यामध्ये एकीचे गाव असून गोविंदा पथकामध्ये जिल्ह्यात अग्रेसर आहे. त्यामुळे सर्वांनी एकीने राहून गावचा सर्वांगीण विकास करावा, असे आवाहनही आ. शिवेंद्रराजे भोसले यांनी केले. तसेच मेढा व जवळवाडीतील मुस्लिम समाजाचे असणारे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




**जवळवाडी येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी बोलताना आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, व्यासपीठावर सरपंच सुरेखा मर्ढेकर व मान्यवर.**

सतीश मर्ढेकर यांनी एका वर्षात शिवेंद्रबाबांच्या माध्यमातून सरपंच सौ. सुरेखा मर्ढेकर यांनी ३ कोटी रुपयांच्या केलेल्या विकास कामांची माहिती दिली व पुढील जवळवाडीच्या विकासाच्या योजनांचा आराखडा मांडला. यावेळी वसंतराव मानकुमरे यांनी चौफेर टोलेबाजी करत मेढा नगरपंचायतीमधील विविध विकासकामांची माहिती दिली.

यावेळी ओझरे ग्रामपंचायतीचे नूतन सरपंच अजितराव मर्ढेकर, रिटकवली गावच्या नूतन सरपंच सौ. शारदा मर्ढे कर यांचा सत्कार आ. शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.

आ. शिवेंद्रराजे भोसले, वसंतराव मानकुंमरे, पांडुरंग जवळ, जवळवाडी सरपंच सौ सुरेखा मर्ढेकर, उपसरपंच शंकर जवळ, गीता ताई लोखंडे सौ कल्पना जवळ, राजेंद्र जवळ, राजेंद्र निकम, कांतीभाई देशमुख, दत्तांना पवार, विकास देशपांडे, संतोष वारागडे, एकनाथ पवार, दत्तात्रय वारागडे, दत्तात्रय सुर्वे, मच्छिंद्र क्षीरसागर, विजय शेलार, भैरवनाथ मंडळाचे अध्यक्ष , सागर जवळ, सुरेश बुवा जवळ, सदाशिव जवळ, पांडुरंग जवळ, बबनदादा जवळ,आनंदा जवळ शंकर भाऊ जवळ, ज्ञानदेव जवळ, रमेश पाटील, अधिक जवळ, बचत गट अध्यक्ष राजश्री जवळ. ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश मर्ढेकर यांनी केले व आभार गीता लोखंडे यांनी मानले.

# ज्योतिर्लिंग श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या जागेवर खासगी व्यक्तीचा दावा

**पुणे : प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगापैकी सहावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराची जागा आपल्या खाजगी मालकीची असल्याचा दावा संतोष पटवा नावाच्या व्यक्तीने केलाय. मात्र मंदिर देवस्थानाच्या विश्वस्तांच्या मते पटवा यांची जागा मंदिराच्या शेजारी आहे. सरकारी रेकॉर्डमध्ये देखील मंदिर आणि भोवतालची सात एकर जागा सरकारी मालकीची असल्याची नोंद आहे. मग संतोष पटवा कोणाच्या पाठबळावर भीमाशंकर मंदिरावर दावा करतायत हा प्रश्न उपस्थित होतोय.

अनादी काळापासून भीमाशंकराच हे मंदिर शिवभक्तांच श्रद्धास्थान आहे. संपूर्ण देशातील शिवभक्त इथे दर्शनासाठी येत असतात. मात्र हे मंदिर आपल्या खाजगी मालकीच असल्याचा दावा संतोष पटवा नावाच्या व्यक्तीने केल्याचा दावा केल्याने खळबळ उडालीय. ही जागा मंदिराचे विश्वस्त सुखदेव कोडीलकर यांच्याकडून आपले काका शांतीभाई पटवा यांनी विकत घेतल्याचा पटवा यांचा दावा आहे. त्यासाठी त्यांनी न्यायालयात धाव घेतलीय. मात्र मंदिर विश्वस्तांच्या मते पटवा यांची ३६ एकर जागा मंदिराच्या बाजूला असून मंदिराची नाही. सरकारी खात्यातील नोंदीदेखीवल हेच सांगत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

मंदिर देवस्थान आणि पटवा यांच्यातील जागेचा हा वाद जुना आहे. मंदिराच्या भोवतालची ३६ एकर जागा आधी सुखदेव कोडीलकर या पुजाऱ्याच्या मालकीची होती. मात्र हा पुजारी आर्थिक अडचणीत सापडल्याने त्यांनी पैशांसाठी ती गहाण ठेवली. ही संधी साधून पटवांनी मंदिराच्या भोवतालची ३६ एकर जागा विकत घेतली. मात्र, आता शेजारच्या ३६ एकर जागेबरोबरच मंदिर ज्या ठिकाणी उभे आहे ती जागाही आपलची असल्याचा पटवा दावा करत आहेत. मंदिर देवस्थानकडून याला न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. भीमाशंकराच हे मंदिर ज्या ठिकाणी आहे, त्याच्या भोवताली इथल्या पुजाऱ्यांची लहान- लहान घरे आहेत. भूमापन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या नकाशात हे मंदिर आणि पुजाऱ्यांची घरे स्पष्टपणे सरकारी जागेवर असल्याचं दर्शविण्यात आलं आहे. ज्या सात एकर जागेबरोबरच पटवा यांच्या ताब्यातील ३६ एकर जागा देखील पुन्हा मंदिर देवस्थानच्या ताब्यात घेण्याचा देवस्थानचा कायदेशीर प्रयत्न सुरु आहे.

# मित्रासाठी अभिजीत पाटलांची पराकाष्ठा; आजारी मित्राला सोलापुरातून मुंबईला केले विमान ॲम्बुलन्सने रवाना

**पंढरपूर : प्रतिनिधी**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांचे जळोली गावचे सहकारी मित्र व विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक दत्तात्रय नरसाळे यांना मागील चार-पाच दिवसांपासून पोटदुखीचा त्रास होत असल्यामुळे सोलापूर येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. आज त्यांना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे उपचारांसाठी विमान ॲम्बुलन्सने हलविण्यात आले आहे.

नरसाळे यांना चार-पाच दिवसांपासून पोटदुखीचा त्रास जाणवत होता. पंढरपूर येथील बोरावके हॉस्पिटलमध्ये २ दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना सोलापूर येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. पोटदुखी आजारामुळे काही शस्त्रक्रियेनंतर त्यांची तब्येत खालावली होती. पोटात आतड्यात इन्फेक्शन जास्त असल्यामुळे ऑपरेशन केले होते.

गेली दोन दिवस अभिजीत पाटील हे मुंबई येथे ठाण मांडून असताना मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये अनेक डॉक्टरांचे सल्ले घेत होते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी सोलापूरच्या अश्विनी हॉस्पिटल येथून सोमवारी दुपारी ४ वाजता ॲम्बुलन्स विमानाने आपल्या मित्राला स्वतः अभिजीत पाटील हे येऊन आपल्या मित्राला मुंबई येथे दाखल केले.



पोटातील आतड्याच्या ऑपरेशनमुळे ट्रान्सप्लान्ट करणे गरजेचे होते. त्यासाठी अभिजित पाटील यांनी हैद्राबाद, मुंबई, पुणे याठिकाणी चौकशी सुरू असताना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे दाखल करण्यासाठी आज अभिजित पाटील यांनी एअर अबुलन्सची सोय करून स्वतः अभिजित पाटील यांनी मित्र दत्तात्रय नरसाळे यांना सोलापूर येथून उपचारासाठी एअरलिफ्ट ॲम्बुलन्सने मुंबईला रवाना केले.

### मित्रासाठी धावले अभिजित पाटील

**सोबत काम करणारा सहकारी त्याच्यावर आज संकट असताना मी त्याला एकटे सोडणे योग्य नाही. त्यांना लवकरात लवकर उपचार सुरु करणे आणि लवकर आजारातून मुक्त करणे ही माझी जबाबदारी आहे. काल मुंबई येथील विविध हॉस्पिटल आणि डॉक्टर्स सोबत चर्चा करून चांगल्या सुखसुविधा व अधिक टेक्नॉलॉजीमुळे मुंबई येथे ग्लोबल हॉस्पिटल येथे हलवण्यात आले आहे. मी स्वत: त्यांच्यासोबत आहे. एअर ॲम्बुलन्स घेऊन सोलापुरातून मुंबईला हॉस्पिटल येथे उपचार सुरू केले आहेत. लवकर आजारातून होऊन बरे होतील.**

## खानापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी सोनाली यादव यांची नियुक्ती




**विटा : प्रतिनिधी**

खानापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी सोनाली यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी खानापूर घाटमाथ्याचे नेते सुहास शिंदे, नगराध्यक्ष डॉ. उदयसिंह हजारे यांनी स्वागत केले.

यावेळी सुहास शिंदे म्हणाले, खानापूर नगरपंचायतीच्या विकासासाठी मुख्याधिकाऱ्यांनी साथ दिली आहे. तुम्ही सुद्धा सहकार्य करावे. नगराध्यक्ष डॉ. हजारे म्हणाले, खानापूर नगरपंचायतीची अनेक कामे प्रलंबित आहेत. ती मार्गी लावण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी सहकार्य करावे. पदाधिकाऱ्यांचे सहकार्य राहिल, अशी ग्वाही दिली.

नूतन मुख्याधिकारी यादव म्हणाल्या, खानापूर नगरपंचायतीचा राज्यात चांगला नावलौकिक आहे. रखडलेली विकासकामे करण्यासाठी प्रामाणिकपणे काम केले जाईल. उपनगराध्यक्ष सुवर्णा कांबळे, गटनेत्या मेघना हिंगमिरे, बांधकाम सभापती सुनील मंडले, सुमन पाटील, नगरसेविका चंदन भगत, जुबेर पिरजादे, रायसिंग मंडले, नगरसेवक रोहित प्रकाश त्रिंबके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# दु:ख बाजूला सारून कार्याला वृक्षारोपण

■ **विसापूर येथे सुनील साळुंखे कुटुंबियांचा उपक्रम**

**कोरेगाव : प्रतिनिधी**

विसापूरचे सुपुत्र व महाबळेश्वर तालुका कृषी अधिकारी सुनील साळुंखे यांच्या कार्याच्या निमित्ताने साळुंखे कुटुंबीयांनी विसापूर येथे स्मशानभूमीत आज वृक्षारोपण करून आगळा उपक्रम राबविला. त्यांच्या पत्नी छाया साळुंखे, भाऊ दिलीप साळुंखे, सयाजी साळुंखे, मुलगी पूजा यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचे सामाजिक स्तरांतून कौतुक होत आहे.



विसापूर येथे वृक्षारोपण करताना सुनील साळुंखे यांचे कुटुंबीय व ग्रामस्थ.

यावेळी माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य सागर साळुंखे, उपसरपंच विठ्ठल साळुंखे, शंकर जगदाळे, ग्रामपंचायत, सोसायटी पदाधिकारी, नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी सुनील साळुंखे यांचे शनिवार दि. ११ रोजी हृदयविकाराने निधन झाले. सुनील साळुंखे यांनी तालुका कृषी अधिकारी म्हणून काम करत असताना जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून अनेक गावांमध्ये डीप सी. सी. टी, ओढ्यांवरती साखळी सिमेंट बंधारे, खोलीकरण, रुंदीकरण करून पावसाच्या पाण्याचा थेंब थेंब अडवून दुष्काळी गावे पाणीदार निर्माण केली. डोंगर, गावातील सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करून निसर्गाचा समतोल राखण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून नेहमी केला जात होता.

सुनील साळुंखे यांच्या कुटुंबीयांनी दु:खाचा डोंगर बाजूला सारत कार्याच्या विधी संस्मरणीय ठरावा आणि वृक्षलागवडीला, पर्यावरणाला गती लाभावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन त्यांच्या कुटुंबीयांनी वृक्षारोपण कार्यक्रम केला.

## साताऱ्यातील जय जवान प्राथमिक शाळेतील शैक्षणिक साहित्याची चोरी

**सातारा :** अज्ञात चोरट्याने एका शाळेतून शैक्षणिक साहित्याची चोरी केल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २६ जानेवारी ते २५ फेब्रुवारी दरम्यान सदर बाजार येथील जय जवान प्राथमिक शाळेतील ७ हजार ६२० रुपये किंमतीचे शालेय साहित्य अज्ञात चोरट्याने चोरी केले आहे.

याबाबतची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस नाईक गुरव करीत आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे - जयसिंह मोहिते पाटील

**अकलूज : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे तसेच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी. चिंतामुक्त जीवन जगावे. छंद जोपासावेत आणि वृद्धापकाळात आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांनी अकलूज येथे केले.

ताहेरा फाउंडेशन अकलूज आयोजित जेष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा या कार्यक्रमातून अध्यक्षपदावरून जयसिंह मोहिते पाटील बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. एम. के. इनामदार होते. प्रसिद्ध चार्टर अकाउंटट आर. सी. फडे हेही उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ताहेरा फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी ज. अबूबकरभाई तांबोळी यांनी फाउंडेशनच्या विविध उपक्रमाची माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक मरहूम स्वर्गीय हाजी अब्दुल कादर यांची आठवण काढत त्यांचे अनेक सहकारी या कार्यक्रमाला उपस्थित असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर फाउंडेशनला सहकार्य करणाऱ्या लोकांचे आभार त्यांनी प्रस्ताविकातून व्यक्त केले. जुन्या पिढीतील ज्या नागरिकांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या मुलांना समाज आणि कुटुंब उपयोगी बनवलं त्या सर्व ज्येष्ठांचा सन्मान ताहेरा फाउंडेशन च्या वतीने बाळदादा आणि डॉक्टर इनामदार तसेच आर सी फडे यांच्या शुभहस्ते प्रत्येकाला सन्मानचिन्ह, मानाचा फेटा व गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.




सत्कारमूर्तीतून बोलताना अबूबकर महंमद शेख यांनी शिक्षणाला महत्त्व असल्याचे सांगितले व स्वतःचे अनुभव त्यांनी सर्वांच्या समोर शेअर करत जाणीवपूर्वक इतरांना मदत करण्याचे आवाहन केले. ताहेरा फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुक केले.

डॉक्टर इनामदार यांनी आपल्या मनोगतामध्ये स्वत:पासून समाज निर्माण होतो आणि समाजातून देश निर्माण होतो. तसेच एकोप्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले. ज्येष्ठांनी आपल्या नातवंडांच्या बरोबर वेळ घालवावा. आजोबा आणि नातू यांचे नातं हे वेगळंच असल्याचं त्यांनी सांगताना एक सुंदर गोष्ट उपस्थितांना सांगून सर्वांचे मन प्रफुल्लित केली.

सर्व सत्कार मूर्तींची नावे पुढीलप्रमाणे प्रा. अबूबकर महंमद शेख तांबवे. हाजी रसूल नदाफ यशवंतनगर. हाजी अली भाई पाटावाला अकलूज. अब्दुल लतीफ करीम शेख माळशिरस. श्री शंकरराव नारायण देशपांडे अकलूज. श्रीमती सुभद्रा भिवा लोंढे अकलूज. मलिकसाहेब बाबनभाई पठाण वरकुटे तालुका इंदापूर.हाजी चांद काझी अकलूज. शकूर खान आमिरखान पठाण चांदापुरी. शेरखान दाऊद खान पठाण अकलूज. मेहबूब चांद मुलाणी अकलूज. रहीम अली शेख गणेशगाव. श्री विश्वनाथ पांडुरंग शेटे गुरुजी अकलूज. अर्जुन शंकर बनसोडे माळीनगर. जैनुद्दीन वजीर शेख अकलूज. युसूफ साहेबलाल शेख अकलूज. खलील अब्बास मुलाणी माळशिरस. हाजी सुलेमानशहा मकानदार अकलूज. हाजी अहमदभाई बागवान. जिलानी शेख अकलूज. ॲड. शब्बीर जमादार मुसलमानवाडी. रफीक पठाण अकलूज.

यावेळी सत्कारमूर्तींच्या सोबत कार्यक्रमाला आलेल्या कुटुंबातील नातेवाईकांच्या चेहऱ्यावर आपल्या घरातील जेष्ठ नागरिकांचा सन्मान होताना पाहून खूप आनंद दिसून येत होता. नातेवाईकांनी उपक्रमाबद्दल खूप समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी डॉ. अब्दुल कलाम आझाद चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष हाजी युसूफ तांबोळी, हाजी बशीरभाई तांबोळी, ॲड. वजीर शेख, मुख्तार कोरबू, भैया माढेकर, अब्बास तांबोळी,दादा तांबोळी,तनवीर तांबोळी, सत्कारमुर्तीचे नातेवाईक इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शकील मुलाणी सर यांनी तर आभार ईलाही बागवान सर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता ताहेरा फाउंडेशनचे हाजी असलम तांबोळी, आयुब तांबोळी,मुसा तांबोळी,जाकीर तांबोळी, शहीद तांबोळी, शादाब तांबोळी ,शौकत तांबोळी यांनी परिश्रम घेतले.

# मातृभूमी आणि मातृभाषा मानवी जीवनात महत्त्वाची

## प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांचे मराठी राजभाषा दिनानिमित्त वक्तव्य

**हिंगोली : प्रतिनिधी**

हिंगोली येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला.

कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षिरसागर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुनिल कांबळे यांची उपस्थिती होती.

डॉ.कांबळे म्हणाले की, 'आपण जी भाषा जन्म जात शिकलो त्या भाषेचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. आपण आपल्या जीवनाचा विकास इतर भाषेतून केला असला तरी माय मराठी भाषा आपली आहे. म्हणून तिचा जीवनात अंगीकार केला पाहिजे.

याप्रसंगी बोलताना मराठी विभागप्रमुख डॉ श्रीराम कऱ्हाळे म्हणाले की, 'मातृभूमी आणि मातृभाषा मानवी जीवनात महत्त्वाची असते म्हणून तिच्या विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असले पाहिजे.'



अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ. बाळासाहेब क्षिरसागर म्हणाले की,' मराठी भाषा देशातील प्रमुख भाषे पैकी एक भाषा आहे. आपली मातृभाषा असल्याने आपण तिची जोपासना करणे गरजेचे आहे.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संगिता मुंढे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.श्रीराम कऱ्हाळे यांनी मानले.

याप्रसंगी कार्यालय अधीक्षक श्री उत्तमराव जाधव, डॉ. गणपत पवार, डॉ. किशोर इंगोले,डॉ. सुभाष शेरकर,डॉ निवृत्ती हुरगुळे, डॉ. इकबाल जावेद, डॉ. गुणाजी नलगे, डॉ. रामदास मुक्टे, डॉ सुधिर वाघ.डॉ.सुनंदा भुसारे, डॉ. मनीषा गवळी, डॉ.संदीप लोंढे,डॉ. सुनील कांबळे, डॉ. बप्पा जाधव, प्रा.बळीराम शिंदे, श्री विजय पवार ,प्रा.आशिष इंगळे, प्रा. दीक्षित इंगोले , श्री उत्तम खिल्लारे आदीसह महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती मंडळ अध्यक्षपदी गायकवाड

**बार्शी :** भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी युवा सामाजिक कार्यकर्ते सनी ऊर्फ बंटी गायकवाड यांची निवड करण्यात आली. बार्शीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरी केली जाते.



भीमनगर मधील बौध्द विहारात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते दीपक बोकेफोडे होते. यावेळी एकमताने सनी गायकवाड यांची निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष- पवन गायकवाड, खजिनदार- शंकर वाघमारे, सचिव- धीरज भोसले, सहसचिव- अक्षय बोकेफोडे व रोहन कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांचे स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले.

## स्पर्धेतून निर्माण होणारे खेळाडू भविष्यातील वाटचालीत यशस्वी ठरतात - श्रीरंग काटेकर

**लिंब : प्रतिनिधी**

स्पर्धेच्या युगात शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी क्रीडा संस्काराची शिदोरी ही सर्वात उपयुक्त ठरणार असल्याचे मत गौरीशंकर जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांनी व्यक्त केले ते लिंब ता. जि. सातारा येथील गौरीशंकर डी फार्मसी लिंब महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात बोलत होते.



यावेळी प्राचार्य विजय राजे ,प्रा.सारिका लोखंडे, प्रा. स्वाती पवार ,प्रा. रणजीत थावरे ,प्रा. स्नेहल माने, रजिस्टर चंद्रकांत बडदे, स्पोर्ट्स प्रतिनिधी गणेश घाडगे आधी प्रमुख उपस्थित होते .

श्रीरंग काटेकर पुढे म्हणाले की बौद्धिक ज्ञानाप्राप्ती बरोबरच क्रीडा क्षेत्रातील कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केली पाहिजेत आजच्या काळाची ती खरी गरज आहे.

प्राचार्य विजय राजे म्हणाले की क्रीडा स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकतेची भावना वाढीला लागते त्यामुळे त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण होतो विद्यार्थ्यांना क्रीडांगणाची गोडी लागावी यासाठीच आम्ही महाविद्यालयस्तरावर दरवर्षी क्रीडा स्पर्धा आयोजित करतो.

यावेळी कबड्डी,खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, चेस, कॅरम स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती पवार व प्रास्ताविक स्वाती पवार यांनी केले.

# चांगल्या कामांचे दस्तऐवजीकरण गरजेचे - डॉ. आ. ह. साळुंखे

### 'शरद पवार आणि महाराष्ट्र- खंड १'चे प्रकाशन

**पुणे : प्रतिनिधी**

पूर्वी घडलेल्या घटनांच्या नोंदी करणे आवश्यक असते. अन्यथा समाजासाठी व्यक्तींचे कार्य योग्य प्रकारे पुढच्या पिढीसमोर जात नाही. ते प्रदूषित होऊन पुढे सरकते. म्हणून चांगल्या कामांचे दस्तऐवजीकरण गरजेचे आहे. ते काम ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावरील ग्रंथाने केले आहे, अशी भावना ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केली.

'स्ट्रॅटेजी कॉर्पोरेशन'च्या वतीने 'शरद पवार आणि महाराष्ट्र खंड १' या ग्रंथाचे प्रकाशन रविवारी डॉ. साळंखे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणून राजकीय विश्लेषक प्रा. डॉ. प्रकाश पवार, एमकेसीएलचे प्रमुख मार्गदर्शक विवेक सावंत. ग्रंथाचे संपादक डॉ.विजय चोरमारे, प्रकल्प संपादक सुरेश इंगळे उपस्थित होते. यावेळी राधेश्याम जाधव (पत्नी अंबिका यांनी स्वीकारला), डॉ. श्रीरंग गायकवाड, मिलिंद संगई, प्रशांत पवार, शिवराज काटकर, प्रवीण शिंदे, विश्वास पाटील, सुधीर लंके या लेखकांचा सत्कार करण्यात आला.





आ.ह.साळुंखे म्हणाले, संत तुकाराम महाराज यांचे सुद्धा संदर्भ बदलण्यात आले, तिथं आपण कोण ?, बऱ्याचदा आपले वारसच चुकीचे संदर्भ देतात, म्हणून दस्तावेजीकरण योग्य पद्धतीने करण्याची गरज आहे.

पूर्वी घडलेल्या घटनांच्या नोंदी घेणे आवश्यक असते. अन्यथा समाजासाठी व्यक्तींनी केलेले कार्य योग्य प्रकारे पुढच्या पिढीसमोर जात नाही, ते प्रदूषित होऊन पुढे सरकते.चांगल्या कामांचे दस्तऐवजीकरण गरजेचे आहे. ते काम ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावरील ग्रंथाने केले आहे. केवळ ग्रंथ लिहून उपयोग नाही, तर ते महाराष्ट्रातील तालुक्यातालुक्यांत जाऊन तेथील युवकांपर्यंत पोहोचले पाहिजे, नाही तर हा ग्रंथ कपाटातच ठेवण्यापुरता उरेल अशी भावना ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केली.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, महाराष्ट्राचा इतिहास लिहायचा असेल तर शरद पवारांशिवाय तो पूर्ण होऊ शकत नाही.असेल, तर पवारांचे नाव घ्यावेच लागेल. लोकशाहीला पुन्हा योग्य दिशेवर आणायचे असेल तर त्याचा दृष्टिकोन या ग्रंथात आहे.

### पवार बसले प्रेक्षकांमध्ये...

**या कार्यक्रमात शरद पवार यांनी हजेरी लावली. परंतु, ते व्यासपीठावर गेले नाहीत. व्यासपीठावर ते येतील, अशी सर्वांची अपेक्षा होती. पण समोर पहिल्या रांगेत जाऊन बसले.**

# मोटरसायकलच्या समोरासमोरील धडकेत एक ठार, दोन जखमी

**सातारा : प्रतिनिधी**

मोटरसायकलच्या समोरासमोरील धडकेत एक ठार, दोन जखमी झाल्याची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान बिजवडी, ता. माण गावच्या हद्दीत फलटण ते दहिवडी जाणाऱ्या रस्त्यावर रामचंद्र तात्याबा दडस रा. पांगरी, ता. माण हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एमएच ११ सीटी ६४९० घेऊन फलटण बाजूकडून दहिवडीकडे जात असताना राँग साईडला जाऊन समोरून येणाऱ्या अजय विठ्ठल शिंदे राहणार मुरूम तालुका बारामती जिल्हा पुणे यांच्या मोटरसायकल क्रमांक एमएच ४२ EB ७६१४ हिस जोराची धडक देऊन झालेल्या अपघातामध्ये त्यांचा मृत्यू झाला असून अजय विठ्ठल शिंदे आणि दिपाली सोमनाथ शिंदे हे दोघेजण जखमी झाले आहे.

या अपघाताची नोंद दहिवडी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार डी डी डोईफोडे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले.
✲ संपादक - नरेश विठ्ठल देसाई ✲ दूरध्वनी पुणे - (०२०) २६९०९०३१ ✲ इमेल - rajdand.pune@gmail.com *Declaration No.* : SDM/SR/07/2023



सातारा : परळी खोऱ्यातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेला आक्रोश मोर्चा.

# परळी खोऱ्यातील शेतकऱ्यांचा साताऱ्यात आक्रोश मोर्चा

## आंदोलकांमध्ये शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**सातारा : प्रतिनिधी**

परळी खोऱ्याच्या जंगल भागात वन्य प्राण्यांचा सुळसुळाट व शेतीची होणारी हानी या प्रकरणी शासनाला जाग आणण्यासाठी माजी जि प सदस्य राजु भैय्या भोसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासह व वनभवन सातारा या कार्यालयांवर जोरदार विराट मोर्चा काढण्यात आला या मोर्चामध्ये लहान मुलांसह शालेय विद्यार्थ्यांसह हजारो शेतकरी महिला विद्यार्थी सहभागी झाले होते शासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करत परळी खोऱ्यातील ग्रामस्थांनी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

राजू भोसले यांच्या नेतृत्वाखाली परळी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने सोमवारी मोर्चाच्या दरम्यान जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात नमूद आहे की सह्याद्री व्याघ्र प्रकल्प कोयना अभयारण्य लगतच्या सह्याद्रीच्या कडे कपारीतील गावांना मोठ्याप्रमाणात वन्य प्राण्यांचा त्रास सोसावा लागत आहे त्याचीच झळ आता लगतच्या सखल भागातील बागायती शेती असणाऱ्या गावांनाही बसु लागली आहे वन्य प्राण्यांच्या संख्येत दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत असुन त्यांना त्यांच्या राखीव क्षेत्रात पुरेसे अन्न ऊपलब्ध नसल्याने ते लोकवस्तीकडे वळु लागले आहेत रात्रंन दिवस थंडी वाऱ्यात शेती ची राखण करूनही वन्य प्राणी एका रात्री शेती फस्त करत असल्याने हातातोंडाशी आलेला घास वन्य प्राण्यांकडुन हिसकावला जात आहे एकंदरीत रानगव्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट सुरू असुन त्यांच्याकडुन शेतीच भुईसपाट होत आहे. रानडुक्कर, साळींदर, मोर, ससे, वानर, माकड, अस्वल, बिबटे आदी वन्यप्राण्यांचाही त्रास वाढला असुन वानर माकडांचा शेतीसह घरांच्या छतावर हैदोस सुरु असून घरात शिरण्याचा त्यांच्या कडुन प्रयत्न होत आहे. बिबट्याकडुन पाळीव जनावरे फस्त होत आहेत. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला असून शेतकऱ्याने शेती संभाळायची की वन्य प्राणी असा प्रश्न निर्माण झाला आहे असा जन आक्रोश व व्यथा या मोर्चामध्ये मांडण्यात आल्या.

मोर्चा पोवई नाक्यावरून जिल्हाधिकारी कार्यालय व वनभवन येथे काढण्यात आला. या मोर्चात परळी खोऱ्याच्या विविध भागातील हजाराहून अधिक ग्रामस्थ सहभागी झाले. या भागातील विविध शाळांच्या दीडशे विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर ठिय्या दिला. शाळा शिकायची की शेती राखायची अशा घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या. पर्यटन पूरक व्यवसायांना परवानगी, शेती उध्वस्त झाल्यास शेतकऱ्यांना वार्षिक मोबदला, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करा, शेतकऱ्यांना बंदुकीचे परवाने द्या इं मागण्या प्रशासनाकडे यावेळी करण्यात आल्या.


# माण तालुक्यात प्रथमच भूकंप

## कोयनेच्या भूकंपमापन केंद्रात ३.६ रिश्टर स्केलची नोंद, आवाजाने नागरिकांमध्ये घबराट, दिवसात तीनवेळा धक्के जाणवले

**दहिवडी : प्रतिनिधी**

माण तालुक्यामध्ये सोमवारी सकाळी आणि दिवसभरात तीनवेळा भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. यामुळे भूकंपाच्या धक्क्याने माण तालुका हादरण्याची ही पहिलीच घटना घडली आहे. या भूकंपाचे मापन कोयनेच्या भूकंपमापन केंद्रात ३.६ रिश्टर स्केल एवढे नोंदवले गेले आहे, तर पळशी-धामणी परिसराच्या पाच किलोमीटर खोल जमिनीत केंद्र असल्याची माहिती मिळाली. या धक्क्याने संपूर्ण परिसर हादरून गेला तर नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली.

माण तालुक्यातील ढाकणी, धामणी व पळशी या परिसरात आज सकाळी १०.३०, दुपारी १२.५० व सायंकाळी ४.५० वाजता हे धक्के जाणवले. या धक्क्यांची तीव्रता एवढी होती की परिसरातील १५ ते १६ घरांना भूकंपामुळे तडे गेले. यासोबतच अनेकांच्या घरात फळ्यांवर आणि कपाटावर ठेवलेली भांडी धडाधड कोसळली. यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



माण प्रशासनाकडे भूकंपमापनाची कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याने सदर भूकंपाची नोंद आणि भूकंप केंद्र हे कराडच्या कोयना भूकंपमापन केंद्रातून माहिती समजली. स्थानिक रहिवाशांनी व मिळालेल्या माहितीनुसार भूकंपकेंद्र हे पळशी धामणी व ढाकणी परिसरात असल्याचे समजते. सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. धामणी गावामध्ये विष्णू रामहरी खाडे, विजय उत्तम खाडे जयराम गोरड, प्रकाश खाडे यांच्या घराला तडे गेले आहेत तर डॉ. श्रीकांत खाडे यांच्या घराला तडे जाऊन घरातील पियुपी केलेले छत खाली पडले तर भिंतीला लावलेला टीव्ही संच हादऱ्याने निखळला. पळशी येथील टिल्लू भोजने, विजय कदम यांच्या घराच्या भिंतीला तडे गेले व संदीप माळवे यांच्या घराची भिंत पडली आहे.

> **“ जमिनीला मोठा हादरा बसून आवाज झाला, मात्र आम्हाला सुरवातीला हा आवाज भूसुरुंगाचा स्फोटाचा असावा असे वाटले. तसेच उरमोडी कालव्याचे परिसरात काम चालू आहे तेथे भूसुरुंगाचा स्फोट झाला असावा, असे वाटले. यासाठी आम्ही नागरिकांनी या कालव्यावर फिरून पाहणी केली. मात्र, परिसरात कोठेही भूसुरुंगाचा स्फोट करण्यात आला नसल्याची माहिती मिळाल्यानंतर भूकंप झाला असल्याची आम्हाला उशिरा माहिती मिळाली. अखेर हा भूकंप झाला असल्याची खात्री पटली.**
>
> **– प्रकाश खाडे, सामाजिक कार्यकर्ते, धामणी**

# जिल्ह्यातील समुदाय आधारित संस्थांनी अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा : प्रतिनिधी**

स्व. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट ) प्रकल्पांतर्गत शेतमाल, मुल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पांसाठी जिल्ह्यातील समुदाय आधारित संस्थांकडून मुल्यसाखळी विकासाचे उपप्रकल्प राबविण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्यासाठी पात्र समुदाय आधारित संस्थांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी आणि त्यांचे फेडरेशन यांचा समावेश आहे.

अर्ज करण्यासाठी पात्रतेचे निकष, अर्जाचा नमुना इ. माहिती https://www.smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट करुन घ्यावा किंवा जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट ) तथा प्रकल्प संचालक आत्मा कार्यालय सातारा येथून घ्यावा. परिपूर्ण भरलेला अर्ज दि. १० मार्च २०२३ रोजी ४.०० वाजेपर्यंत सादर करावा. यापूर्वी अर्ज केलेला आहे परंतु सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्राथमिक मंजूरी न मिळालेल्या संस्था तसेच यापूर्वी अर्ज न केलेल्या संस्थांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा अंमलबजावणी कक्ष (स्मार्ट) तथा प्रकल्प संचालक आत्मा सातारा विजयकुमार राऊत यांनी केले आहे.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**सातारा : प्रतिनिधी**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ साहित्यिक व ज्ञानपिठ पुरस्कार विजेते कविवर्य वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिवसानिमित्त ग्रंथ प्रदर्शन भरवून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी दत्तात्रय कोकरे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अमित सोनवणे यांच्यासह दोन्ही कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये मराठी भाषेचे महत्व व आजच्या दिनाचे महत्व याचे प्रतिपादन केले.

# ग्रामीण महिला नवउद्योजकांची अनोखी ‘कराडची जत्रा’

## कराड पंचायत समिती उमेद अभियान व ज्ञानदीप सामाजिक संस्थेचा उपक्रम

**सातारा : प्रतिनिधी**




कराड तालुक्याच्या ग्रामीण भागातील बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवणे व प्रोत्साहन देण्यासाठी नाविण्यपूर्ण अशा कराडच्या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या कराडच्या जत्रेत १०० स्टॉल मधून घरगुती व दर्जेदार उत्पादने खरेदी करण्याची संधी कराडकरांना उपलब्ध होणार असल्याची माहिती कराड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी मिना साळुंखे यांनी दिली.

यावेळी ज्ञानदीप राष्ट्रीय सामाजिक व शैक्षणिक विकास संस्थेचे अध्यक्ष आनंदा थोरात, सहाय्यक गटविकास अधिकारी विजय विभुते, उमेद तालुका अभियान व्यवस्थापक निलेश पवार उपस्थित होते.

उमेद तालुका अभियान कक्ष पंचायत समिती कराड व ज्ञानदीप राष्ट्रीय सामाजिक व शैक्षणिक व संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, प्रकल्प संचालक चंचल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि.२८ फेब्रुवारी ते बुधवार दि.१ मार्च २०२३ रोजी कराड येथील बैल बाजार मैदान, कराड शेती उत्पन्न बाजार समिती येथे कराड जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकसहभागातून होत असलेल्या जत्रेत महिला बचत गटांना निशुल्क मोफत स्टॉल देण्यात आले आहेत.

या दोन दिवशी विविध स्टॉल्समध्ये हातसडीचा तांदूळ, इंद्रायणी तांदूळ, चिक्की, विविध मसाले, शुगर फ्री बिस्किटे, सेंद्रिय हळद, लाकडी खेळणी, सेंद्रिय गुळ व काकवी, गांडूळ खत, स्ट्रॉबेरी, कुरडई, भातवडी, सांडगे आदीसह उन्हाळी पदार्थ, पापड, विविध लोणची, गारमेंट, शोभेच्या वस्तू, खाद्यपदार्थ (कडधान्य विविध प्रकारचे), इमिटेशन ज्वेलरी, विविध प्रकारच्या चटण्या, आवळा कॅन्डी, शाकाहारी जेवण, थालीपीठ, गुळपोळी बरोबरच बिर्याणीचे स्टॉल, गोधडी, पिलो कव्हर, क्रॉफ्ट बॅग्स, मातीची भांडी, ड्रेस, चप्पल, स्वीट कॉर्नर, ड्रेस, बेकरी प्रॉडक्ट आदींचा सहभाग आहे. या जत्रेस जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देऊन खरेदीचा आनंद घ्यावा असे आवाहन गट विकास अधिकारी श्रीमती साळुंखे यांनी केले.

> **उमेद अभियान अंतर्गत सुरू असलेल्या महिला स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित मालाचे विक्री प्रदर्शन महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस यात्रा आणि पुणे विभागीय स्तरावर भीमथडी यात्रेच्या माध्यमातून होत असते. तसेच सातारा जिल्हा स्तरावर मानिनी यात्रा होत असते. राज्यात पहिल्यांदाच तालुकास्तरावर महिला बचत गटाच्या उत्पादित मालाचे विक्री प्रदर्शन कराडच्या जत्रेच्या निमित्ताने होत आहे. विशेषतः लोकसहभागातून होणारा हा नाविण्यपूर्ण उपक्रम महिला बचत गटांना पाठबळ देणारा आणि ग्राहकांना खात्रीशीर व दर्जेदार घरगुती मालाचे उत्पादन खरेदी करण्याची संधी मिळाली आहे.**

# मराठी ही ज्ञानभाषा व्हावी : प्राचार्य डॉ. गुरूनाथ फगरे

**वाई : प्रतिनिधी**

व्यवहारातील मराठी भाषेच्या वापराबरोबरच ती ज्ञानभाषा होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गरुनाथ फगरे यांनी केले. येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयात मराठी विभाग, ग्रंथालय विभाग आणि सुनिधी पब्लिशर्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भित्तीपत्रक व ग्रंथप्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी उदघाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी कला विभागचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सुनिल सावंत, विज्ञान विभागाचे उप्राचार्य प्रा. डॉ. ज्ञानदेव झांबरे, वाणिज्य विभागचे उप्राचार्य प्रा. डॉ. विनोद वीर व सुनिधी पब्लिशर्स, पुणे यांचे व्यवस्थापकीय संपादक श्री. अविनाथ काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



उद्घाटकीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. गुरूनाथ फगरे पुढे म्हणाले, २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनी साहित्यिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. मराठी ग्रंथांचे वाचन करून सर्वांनी आपली अभिरूची जोपासली पाहिजे. ग्रंथप्रदर्शनाच्या माध्यमातून मराठी वाचकांनी किमान एका ग्रंथाची खरेदी करून आपले ज्ञान व मराठी भाषेवरील आपले प्रेम वृध्दींगत करावे.

आपले विचार व्यक्त करताना, मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत कांबळे म्हणाले, भारतातील प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक आहे. इतर भाषांमधील अनेक शब्द मराठी भाषेत आल्याने ती समृध्द होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही काळाची गरज आहे. याप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या साहित्यिक योगदानाची त्यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाची सुरूवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर महाराष्ट्रगीत व लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे गौरवगीत घेण्यात आले. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावर आधारित विविध विषयांवरील भित्तीपत्रके तयार केली होती, त्यांचेही प्रदर्शन भरविण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. शिवाजी कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. संग्राम थोरात यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. धनंजय निंबाळकर, श्री. अमोल कवडे, डॉ. चंद्रशेखर भारती, श्री. सुमंत सावंत, श्री. संतोष चौगुले, कु. शुभदा जठार, कु. प्रियांका घोलप, कु. श्रेया बगाडे, कु. नेहा काळोखे, कु. प्राजक्ता हाके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोरेगावात ८ विकास सेवा सोसायटीची निवडणूक जाहीर

## तळीये बिनविरोध झाल्याने सात सोसायट्यांची निवडणूक सुरू; ८ मार्चला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव तालुक्यातील ‘‘ब‘‘ वर्गातील कुमठे, नागझरी, तळीये, विखळे, वाघोली, वाठार स्टेशन, तडवळे संमत वाघोली, रेवडी या आठ विकास सेवा सोसायटी पंचवार्षिक निवडणूकीत तळीये बिनविरोध झाल्याने ७ सोसायट्याची निवडणूक लागली आहे. अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आणि छाननी पूर्ण झाली असल्याची माहिती सहकार उपनिबंधक सौ. प्रीती काळे यांनी दिली.

कोरेगाव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या संवेदनशील आणि लोकसंख्या सभासद संख्या ज्यादा असलेल्या आठ विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया सुरू असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

दरम्यान, आठ पैकी तळी सोसायटीच्या निवडणुकीसाठी १३ जागांसाठी १३ अर्ज दाखल झाल्याने ही सोसायटी बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली असून ८ मार्च ही अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. त्यानंतर निवडणुकांची अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर आवश्यकता असल्यास १८ मार्च रोजी विखळे वाटर स्टेशन रेवडी व वाघोली सोसायटीमध्ये प्रत्यक्ष मतदान होऊन त्याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येतील. आवश्यकता असल्यास १९ रोजी कुमठे नागझरी तडोळे संमत वाघोली विकास सेवा सोसायटी प्रत्यक्ष मतदान होऊन त्याच दिवशी मतमोजणी पूर्ण करून निकाल जाहीर करण्यात येतील.

दरम्यान, तळीये ग्रामस्थांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी गटतट बाजूला ठेवून विकास सेवा सोसायटीच्या निवडणुकीत एकूण १३ जागांसाठी १३च उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# शेंद्रे येथील पेटवून घेतलेल्या महिलेचा मृत्यू

**सातारा : प्रतिनिधी**

राहत्या घरी स्वतःस पेटवून घेतलेल्या महिलेचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जयश्री राजेंद्र निकम रा. शेंद्रे, ता. सातारा या महिलेने राहत्या घरी पेटवून घेतल्याने त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर पुणे येथील ससून हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस नाईक महांगडे करीत आहेत.

# दहावीच्या निरोप समारंभादिवशी अपघातात विद्यार्थी ठार; दोघे जण जखमी

## पाटण तालुक्याच्या मरळी परिसरातील दुर्दैवी घटना

**पाटण : प्रतिनिधी**

इयत्ता दहावीच्या निरोप समारंभादिवशीच मोटरसायकल व जीपच्या अपघातात मरळी (ता.पाटण) येथील एक विद्यार्थी जागीच ठार झाला. तर अन्य दोन विद्यार्थी गंभीर जखमी झाले. ही घटना आज (दि.२५) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास देसाई कारखाना परिसरात घडली. प्रतिक रमेश पाटील (वय १६) असे अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. हर्षद गजानन पाटील (वय१६) व सुमित निवास टोपले (वय१६) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. हे तिघेही मरळी (ता.पाटण) येथील रहिवासी आहेत.

मल्हारपेठ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मरळी येथील वत्सलादेवी विद्यालयात शनिवारी इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाला प्रतिक पाटील, हर्षद पाटील व सुमित टोपले हे जाणार होते. दरम्यान, हे तिघे एकाच मोटरसायकलवरून मरळीहून देसाई कारखान्याच्या दिशेने जात होते. यावेळी ते गणेश मंदिरासमोरील उताराला आले असता दुचाकीवरील ताबा सुटल्याने समोर येणा-या जीपला जोराची धडक बसली. या धडकेत चालक प्रतीक पाटील हा विद्यार्थी जागीच ठार झाला. तर हर्षद पाटील व सुमित टोपले हे जखमी झाले. त्यांना तातडीने रूग्णालयात हलवण्यात आले.

मृत प्रतिक पाटील याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दहावी परीक्षेच्या निरोप समारंभादिवशीच एका विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने मरळी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघाताची नोंद मल्हारपेठ पोलीस ठाण्यात झाली आहे.

# नेपाळ पुन्हा राजकीय संकट : पंतप्रधान प्रचंड यांचा कतार दौरा रद्द, सर्वात मोठ्या मित्र पक्षाने युती सोडली; राष्ट्रपतीपदाची निवडणूक ९ मार्चला

**काठमांडू : वृत्तसंस्था**

नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल उर्फ प्रचंड यांनी ३ मार्च रोजी होणारा कतार दौरा रद्द केला. ९ मार्च रोजी होणाऱ्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीपूर्वी आघाडी सरकारमधील मतभेदामुळे त्यांनी हा निर्णय घेतला.

३ मार्चपासून कतारची राजधानी दोहा येथे अल्पविकसित देशांची पाचवी परिषद होणार होती. प्रचंड यांनी यामध्ये भाग घेणे आवश्यक होते. परंतु त्यांनी देशाऐवजी राजकारणाला प्राधान्य देत कतार दौरा रद्द केला. सोमवारी, आघाडी सरकारचा भाग असलेल्या नेपाळ युनिफाइड मार्क्सिस्ट लेनिनिस्ट (उझछ-णचङ) ने युती सोडण्याची घोषणा केली. त्याचे प्रमुख माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली आहेत.

प्रचंड यांच्या नेतृत्वाखाली दोन महिन्यांपूर्वी नेपाळमध्ये आघाडी सरकार स्थापन झाले. पहिली अडीच वर्षे प्रचंड पंतप्रधान राहतील आणि त्यानंतर सीपीएन-यूएमएलचे प्रमुख केपी शर्मा ओली अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतील, असे ठरले होते. दोन महिने सरकारचा कारभार सुरळीत चालला. विद्यमान राष्ट्रपती विद्यादेवी भंडारी यांचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने ९ मार्च रोजी राष्ट्रपतीपदाची निवडणूक होणार आहे. प्रचंड हे आघाडी सरकारच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवाराला पाठिंबा देणार होते, पण त्यांनी सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. दोन दिवसांपूर्वी पंतप्रधानांनी विरोधी नेपाळी काँग्रेसचे उमेदवार रामचंद्र पौड्याल यांना पाठिंबा देण्याची घोषणा केली. प्रचंड यांच्या या निर्णयामुळे ओली यांचा पक्ष संतप्त झाला.

दुसरीकडे, पौड्याल यांचा दावा मजबूत करण्यासाठी नेपाळी काँग्रेसने ८ पक्षांच्या नेत्यांचे टास्क फोर्स तयार केले. याहीपेक्षा या टास्क फोर्सची बैठक प्रचंड यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या शासकीय निवासस्थानी (बाळुवाटार) झाली. या पक्षांच्या खासदारांना राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या मतदानाच्या दोन दिवस आधी म्हणजे ७ मार्चला काठमांडूला पोहोचण्यास सांगण्यात आले होते. प्रचंड यांनी एनसी अध्यक्ष शेर बहादूर देउबा यांच्यासोबत गुप्त बैठकही घेतली.



'काठमांडू पोस्ट'नुसार, सीपीएन-यूएमएल युती सोडल्याचा सध्या प्रचंड सरकारवर कोणताही परिणाम होणार नाही. कारण सीपीएन-यूएमएलचे ७९ खासदार होते. आघाडीतून बाहेर पडल्यानंतर नेपाळी काँग्रेस (८९) आघाडीत सामील होईल. यामागील बार्गेनिंगही स्पष्ट आहे. नेपाळी काँग्रेसचे रामचंद्र पौड्याल अध्यक्ष होणार आहेत. दुसरीकडे, प्रचंड यांना अडीच वर्षांनी पंतप्रधानपदाची खुर्ची सोडावी लागणार नाही. याचे कारण म्हणजे सीपीएन-यूएमएल आणि ओली या अटीवर सरकार आणि युतीचा भाग बनले की प्रचंड आधी अडीच वर्षे अध्यक्षपदी राहतील आणि नंतर ओली. आता मात्र ओली यांनी युती सोडल्याने त्यांचे पंतप्रधानपदाचे स्वप्न तूर्तास भंगले आहे.

प्रचंड यांनी युती सोडण्यास भाग पाडल्याचा ओली यांच्या पक्षाचा आरोप आहे. ते मंत्र्यांवर राजीनामे देण्यासाठी दबाव आणत होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रचंड यांनी परराष्ट्र मंत्री बिमला राय पौड्याल यांना काठमांडू विमानतळावरून परत बोलावले होते. त्या एका परिषदेसाठी जिनिव्हाला जात होत्या.

६८ वर्षीय प्रचंड गेल्या वर्षी २६ डिसेंबर रोजी पंतप्रधान झाले. मग त्यांनी नेपाळी काँग्रेसशी गद्दारी करून निवडणूकपूर्व युती तोडली आणि ओलीसोबत गेले. आता ओली यांचा विश्वासघात करून नेपाळी काँग्रेससोबत गेले. दोन्ही वेळा आपले राजकीय हित पाहिले.

विशेष म्हणजे गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीनंतर नेपाळी काँग्रेसने प्रचंड यांना राष्ट्रपती किंवा पंतप्रधान होऊ देणार नसल्याचे स्पष्ट केले होते. प्रचंड सहमत नसताना नेपाळी काँग्रेसने आघाडी सोडली आणि ओली यांना प्रचंड यांच्याशी हातमिळवणी करण्याची संधी दिली.

आता व्यवहाराचे सूत्र अगदी स्पष्ट झाले आहे. नेपाळी काँग्रेसचे उमेदवार राष्ट्रपती होतील आणि प्रचंड पंतप्रधान राहतील. पण, नेपाळी काँग्रेस आणि प्रचंड यांच्यातील संबंध फार काळ टिकले नाहीत. त्यामुळे यावेळी किती दिवस एकत्र राहणार. वाट पाहावी लागेल.

उपपंतप्रधान राजेंद्र सिंह लिंगदेन यांच्यासह राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाच्या (आरपीपी) चार मंत्र्यांनी यापूर्वीच राजीनामा दिला आहे.

९० च्या दशकात नेपाळमधून राजेशाही संपवलेल्या चेहऱ्यांमध्ये प्रचंड हे सर्वात मोठे नाव आहे. २५ वर्षे भूमिगत राहिलेल्या शिक्षिका ६८ वर्षीय प्रचंड यांच्या नेतृत्वाखाली दहा वर्षांचा सशस्त्र संघर्ष झाला. आणि हा संघर्ष नेपाळमधील राजकीय बदलाचे प्रमुख कारण आहे. माओवादी या संघर्षाकडे 'जनयुद्ध' म्हणून पाहतात.

चितवन येथील नारायणी विद्या मंदिरात दहावीत शिकत असताना प्रचंड यांनी छवीलाल दहल हे नाव बदलून पुष्प कमल दहल केले. १९८१ मध्ये पंचायतविरोधी आंदोलनात भूमिगत झालेले प्रचंड २० जुलै २००६ रोजी बालुवाटारमध्ये सार्वजनिकरित्या दिसले.

भूमिगत असताना त्यांनी कल्याण, विश्वास, निर्माण आणि प्रचंड ही नावे घेतली. याआधी तो छभीलालमधून पुष्प कमल बनला होता. ते शिक्षक म्हणून कार्यरत असताना त्यांना कल्याण या नावाने ओळखले जायचे. यानंतर मशालचे केंद्रीय सदस्य झाल्यानंतर ते विश्वास म्हणून ओळखले जाऊ लागले.

# काश्मिरी अतिरेकी पाकिस्तानात ठार : हल्लेखोरांनी खालिद रझाला गोळ्या घातल्या

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानच्या कराची शहरात सोमवारी काश्मीरमधील अल-बद्र अतिरेकी संघटनेचा कमांडर सय्यद खालिद रझा मारला गेला. अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला. खालिदचा काश्मीरमध्ये सक्रीय असणाऱ्या अतिरेक्यांशी जवळचा संबंध होता. सिंधुदेश रिव्होल्यूशनरी आर्मीने त्याच्या हत्येची जबाबदारी घेतली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, हल्लेखोरांनी खालिद रझाच्या घराबाहेरच त्याला गोळ्या घातल्या. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. खालिद रझा काश्मीरमधील अतिरेक्यांचा कमांडर होता. त्यानंतर तो कराचीत स्थायिक झाला. तिथे तो फेडरेशन ऑफ प्रायव्हेट स्कूलचा उपाध्यक्ष झाला.



सय्यद खालिद रझा आठवड्याभरात मारला जाणारा दुसरा मोठा अतिरेकी आहे. गत आठवड्यातच हिजबुल मुजाहिदीनचा टॉप कमांडर बशीर अहमद पीर मारला गेला होता.

बशीर अहमद पीर हा हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तोयबासारख्या अतिरेकी संघटनांसाठी माजी अतिरेक्यांना एकजूट करण्याचा प्रयत्न करत होता. यासाठी त्याने ऑनलाइन ॲक्टिव्हिटीज सक्रीय सहभाग घेतला होता. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल त्याला गतवर्षी ४ ऑक्टोबर रोजी दहशतवादी घोषित करण्यात आले होते.


बशीर गत आठवड्यात गुरुवारी आपल्या घराजवळच्या मशिदीत नमाजासाठी गेला होता. मशिदीबाहेर आल्यानंतर तो तेथील एका दुकानाजवळ उभा राहिला. तिथे दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्याच्यावर गोळीबार केला.

बशीर अहमदला इम्तियाज आलम नावाने ओळखले जात होते. जम्मू काश्मीरमधील विविध अतिरेकी घटनांत त्यांचा हात होता. तो हाजी, पीर व इम्तियाजच्या कोडनेमने जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी कारवाया करत होता. बशीर गत काही वर्षांपासून रावळपिंडीमध्ये राहत होता. पाक सरकारने त्याला आपल्या देशाचे नागरिकत्व दिले होते.

# नासाची स्पेस-X क्रू-६ मोहीम लांबली : प्रक्षेपणापूर्वी रॉकेटच्या इंजिनात बिघाड

**वॉशिंग्टन : वृत्तसंस्था**

NASA ची स्पेस-X क्रू-६ मोहीम लांबवणीवर पडली आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, स्पेस-X फाल्कन-९ रॉकेटच्या (ड्रॅगन एंडेव्हर) बिघाड झाल्यामुळे त्याचे प्रक्षेपण ऐनवेळी टाळण्यात आले. आता ते अमेरिकेच्या फ्लोरिडाच्या केनेडी स्पेस सेंटर क्रमांक ३९अ हून सोमवारी रात्री उशिरा १.४५ वा. (भारतीय प्रमाणवेळेनुसार मंगळवारी दुपारी १२.४५ वा. ) प्रक्षेपित होईल.



स्पेस-द ने एका निवेदनाद्वारे म्हटले की, TEA-TEB ग्राउंड सिस्टममध्ये बिघाड झाल्यामुळे क्रू-६ चे प्रक्षेपण झाले नाही. स्पेस-X चे फाल्कन-९ रॉकेट ४ अंतराळपटूंना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापर्यंत पोहोचवणार होते. हे एलन मस्कच्या स्पेस -द ची सहावी ऑपरेशनल क्रू फ्लाइट होती. यात नासाच्या २, रशियाच्या १ व UAE च्या एका अंतराळपटूचा समावेश होता.

हे अंतराळपटू ६ महिन्यांपर्यंत ISS वर राहतील. तिथे ते हार्ट मसल टिश्यू, मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये मानवी पेशी व टिश्यू प्रिंट करणाऱ्या बायोप्रिंटरचे परिक्षण करतील. तसेच औषध उत्पादनाच्या तंत्रज्ञानावरही रिसर्च करतील.

क्रू-६ मोहिमेतील ४ अंतराळपटूंमध्ये नासाच्या स्टीफन बोवेन व वॉरेन वुडी होबर्ग यांचा समावेश आहे. याशिवाय णअए च्या सुलतान अल्नेयादी व रशियन अंतराळ संशोधन संस्था रोस्कोस्मोस च्या अँड्री फेडेएव्ह यांचाही या मोहिमेत समावेश आहे.

अल्नेयादी अंतराळ स्थानकावर प्रदिर्घ काळासाठी जाणारे UAE चे पहिले अंतराळपटू आहेत. त्यांची निवड मोहम्मद बिन राशीद स्पेस सेंटरच्या नासा व एग्जिऑम स्पेसमध्ये झालेल्या एका करारांतर्गत झाली आहे.

# खरगे फक्त नामधारी अध्यक्ष : रिमोट कंट्रोल कोणाच्या हातात आहे हे सर्वांना माहीत

## पंतप्रधान मोदींची काँग्रेसवर टीका

**बेळगाव : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटकातील काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर जोरदार टीका केली. खरगे हे केवळ नावापुरतेच काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. रिमोट कंट्रोल कोणाच्या हातात आहे हे सर्वांना माहीत आहे, असे पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधान सोमवारी शिवमोगा आणि बेळगावी दौऱ्यावर होते.

काँग्रेसला वाटतं मोदी जिवंत असेपर्यंत त्यांचे हेतू पुर्ण होणार नाहीत आणि म्हणूनच ते सगळे ''मर जा मोदी, मर जा मोदी...'' असे म्हणतात. तर काही म्हणतात ''मोदी तेरी कब खुदेगी'' . पण देश म्हणतोय ''मोदी तेरा कमल खिलेगा''.

मल्लिकार्जुन खरगे यांनी शक्य होईल त्या मार्गाने जनतेची सेवा केली आहे. पण, त्यांचा काँग्रेसने ज्या प्रकारे अनादर केला. ते पाहून मी निराश झालो. रिमोट कंट्रोल कोणाकडे आहे हे जगाला माहीत आहे, असे मोदी म्हणाले.



या कार्यक्रमाला पंतप्रधान मोदींसोबत कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बीएस येडियुरप्पाही उपस्थित होते. येडियुरप्पा यांचा आज ८० वा वाढदिवस आहे. मोदींनी व्यासपीठावर हात जोडून त्यांना नमस्कार केला. यानंतर त्यांनी सभेला उपस्थित लोकांकडून मोबाईलचा फ्लॅश लाईट चालू करून येडी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मोदी म्हणाले की, येडियुरप्पा यांनी आपले जीवन गरीब आणि शेतकऱ्यांसाठी समर्पित केले आहे. गेल्या आठवड्यात कर्नाटक विधानसभेत त्यांनी केलेले भाषण हे सार्वजनिक जीवनात असलेल्या प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. येडियुरप्पा यांनी नम्र कसे राहायचे हे दाखवून दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी कर्नाटकातील शिवमोग्गा विमानतळाचे उद्घाटन केले. सुमारे ४५० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या या विमानतळाच्या वरच्या भागाची रचना कमळाच्या फुलासारखी करण्यात आली. शिवमोग्गा येथे ३,६०० कोटी रुपये आणि बेळगावात २,७०० कोटी रुपयांच्या योजनांचे उद्घाटन आणि पायाभरणीही मोदी यांच्या हस्ते झाली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राचा डंका जगभरात वाजत आहे. छोटी शहरेही हवाई संपर्काने जोडली गेली पाहिजेत, असा विचार काँग्रेसच्या मनात कधीच नव्हता. आम्ही त्यावर पूर्णपणे आम्ही काम करत आहोत. भाजप सरकार किती वेगाने काम करत आहे, याची कल्पना करू शकता.

# विनेश फोगटची योगेश्वर दत्तवर कारवाईची मागणी

## WFI अध्यक्षांना पाठिंबा तसेच प्रकरणातील तथ्य लीक करण्याचा केला आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंग यांच्यावर देशातील कुस्तीपटूंनी लावलेल्या शारीरिक शोषणाच्या गंभीर आरोपाच्या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. विनेश फोगट हिने ट्विट केले आहे, ज्यात तिने लिहिले आहे की, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या दोन्ही समित्यांचे सदस्य लैंगिक छळाच्या तक्रारीचे तथ्य लीक करत आहेत.

मीडिया रिपोर्ट्स वाचल्यानंतर तिला याची माहिती मिळाली. त्यामुळे त्या सदस्यावर कडक कारवाई करून त्यांना समितीतून तत्काळ हटवावेअसे तिने म्हटले आहे. विनेश फोगटने ट्विटमध्ये केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांना टॅग केले.

विशेष म्हणजे मेरी कोमला खजअ आणि क्रीडा मंत्रालयाने स्थापन केलेल्या समित्यांच्या अध्यक्षपदी नियुक्त केले आहे. तर दोन्ही समित्यांमध्ये फक्त हरियाणाचा कुस्तीपटू योगेश्वर दत्तचा समावेश आहे. ज्यावर विनेशने आधीच विरोध दर्शविला आहे.

विनेश फोगटने ट्विटमध्ये लिहिले की- मला अलीकडेच कळले आहे की ओव्हर साइट कमिटीचा एक खेळाडू कालपासून लैंगिक छळाच्या तक्रारीची सामग्री लीक करत आहे. प्रसारमाध्यमांचे वृत्त वाचून त्यांना याची माहिती मिळाली.

एक खेळाडू या नात्याने, ओव्हर साइट कमिटीचा सहकारी खेळाडू अशाप्रकारे अनौपचारिकपणे वागतो ही बाब अत्यंत निराशाजनक आहे. त्यांचा महिलांबद्दलचा दृष्टिकोन अशा वागण्यातून दिसून येतो.

ती म्हणाली की हे खेळाडू थत्रख च्या उच्च पदावरील अधिकार्यांवर लैंगिक छळाच्या आरोपांची चौकशी करणार्या दोन्ही समित्यांचे सदस्य आहे हे अधिक धोकादायक आहे. त्यामुळे समितीच्या कारभारावरच अविश्वास निर्माण झाला आहे.

मी केवळ उदासीनच नाही तर या समिती सदस्याच्या धोरणात्मक प्रयत्नांच्या अभावामुळे निराश झाली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष आणि न्याय्य चौकशी व्हायला हवी होती. अशाप्रकारे आपल्या पदाचा वापर करणाऱ्या सदस्यावर कठोर कारवाई करण्यात यावी आणि त्याला समितीतून त्वरित काढून टाकण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

विनेश म्हणाली की, ही चिंता केवळ या चौकशीच्या कारवाईपुरती मर्यादित नाही, कारण मला खात्री आहे की माजी अध्यक्षांना या सदस्याचा पाठिंबा मिळत आहे. हा सदस्य पहिल्या दिवसापासून महिलांच्या हिताच्या विरोधात काम करत आहे.

समितीच्या कारवाईदरम्यान या खेळाडूने दाखवलेला सहानुभूतीचा अभाव आणि असंवेदनशीलता धक्कादायक होती. माझी विनंती आहे की या प्रकरणाची त्वरित दखल घ्यावी आणि आवश्यक ती कारवाई करावी.

# दहशतवादी लीडर सलाहुद्दीन पाकिस्तानात : सैन्यांच्या गराड्यात 'लष्कर कमांडर'च्या अंत्ययात्रेला आला

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

यूएनने (युनायटेड नेशन्स) आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित केलेला व युनायटेड जिहादी काउन्सिलचा नेता सय्यद सलाहुद्दीन पुन्हा एकदा पाकिस्तानात दिसला आहे. त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून आहे. यात धक्कादायक बाब म्हणजे दहशतवादी सलाहुद्दीनसोबत पाकिस्तानी आर्मीचे कमांडो देखील दिसून येत आहे.

अलीकडेच मारला गेलेला लष्कर कमांडर बशीरच्या अंत्यसंस्काराला सलाहुद्दीन उपस्थित होता. या ठिकाणी झालेल्या भाषणात सलाहुद्दीनने भारताला हल्ल्याची धमकी दिली. दहशतवादी नेत्याच्या या व्हिडिओवरून फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स (ऋअढऋ) देखील सतर्क झाले. पाकिस्तानच्या अनेक पत्रकारांनी या व्हिडिओला दुजोरा दिला असून याबाबत शाहबाज शरीफ सरकार आणि लष्कराने अद्यापही मौन बागळले आहे.

काही माध्यमांच्या वृत्तानुसार, लष्कर-ए-तैयबाचा कमांडर बशीर अहमद याची गेल्या आठवड्यात रावळपिंडीच्या बाजारात गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. हल्लेखोरांचा अद्याप शोध लागलेला नाही. बशीर यांच्यावर शुक्रवारी रावळपिंडी येथील कबरीत अंत्यविधी करण्यात आला. यावेळी सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त लोकांची उपस्थिती होती.

या अंत्ययात्रेत युनायटेड जिहादी काऊन्सिलचा नेता सय्यद सलाहुद्दीनही सहभागी झाला होता. त्याला णछ ने आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित केले. सलाहुद्दीन जेलमध्ये असल्याचा पाकिस्तान सरकारचा दावा आहे. मात्र, त्याचा व्हिडिओ समोर आल्यानंतर पाकिस्तानने केलेला खोटा दावा पुन्हा जगासमोर आला आहे.

सलाहुद्दीन अंत्यसंस्कारात भाषण देत असताना त्याला पाकिस्तानी लष्कराच्या



कमांडो युनिटने घेरले. हे सर्वजण गणवेशात होते. साहजिकच त्याला संपूर्ण सुरक्षा पूरवली गेली असावी.

रावळपिंडीला पाकिस्तानचे सर्वात शक्तिशाली शहर देखील म्हटले जाते. याचे कारण येथे पाकिस्तानी लष्कराचे मुख्यालय आहे. सरकारपेक्षा सैन्य अधिक शक्तिशाली मानले जाते. पाकिस्तान वेगळा देश होऊन ७६ वर्ष झाली. परंतू अर्ध्यापेक्षा जास्त काळ लष्कराने पाकिस्तानावर राज्य केले आहे.

सलाहुद्दीन १९८९ पासून ॲक्टिव आहे. तो मुळचा काश्मीरचा आहे. त्याच्या मुलाला गेल्या वर्षी सरकारी नोकरीतून काढून टाकण्यात आले. सलाहुद्दीनला २०१७ मध्ये णछने आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित केले होते.

पाकिस्तानी पत्रकार कमर चीमा आणि आलिया शाह यांच्याशिवाय, आरजू काझमीने सोशल मीडियावर सांगितले आहे की, सलाहुद्दीन स्वतः रावळपिंडीत असून तो लष्कराच्या आश्रयाखाली मुक्तपणे संचार करतो.

पाकिस्तान गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये ऋअढऋ च्या ग्रे लिस्टमधून बाहेर पडला होता. या आर्थिक वॉच डॉगच्या देखरेखीच्या यादीत त्याचा अजूनही समावेश आहे. सध्या ऋअढऋ चे प्रमुख भारतीय वंशाचे टी. राजा कुमार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, FATF सलाहुद्दीनच्या रावळपिंडीमध्ये दिसण्यावर, दहशतवाद्याच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहणे आणि भाषण देणे यावर बारीक नजर ठेवून आहे. यासंदर्भात पाकिस्तानकडून माहिती मागवण्यात आली आहे. पाकिस्तान सरकारने अद्याप कोणतेही वक्तव्य केलेले नाही.

आर्थिक संकटात सापडलेल्या पाकिस्तानसाठी दहशतवाद्यांना आश्रय देणे ही नवी समस्या ठरू शकते. विशेष म्हणजे पाकिस्तानी लष्कराचे मुख्यालय जिथे आहे तिथे हे दहशतवादी हजर आहेत. सलाहुद्दीनने आपल्या भाषणात काश्मीरमध्ये नव्याने जिहाद सुरू करून भारताला नष्ट करण्याची धमकी दिली आहे. याबाबत भारत सरकारने अद्याप काहीही सांगितलेले नाही.

बशीर यांचे पूर्ण नाव पीर बशीर अहमद पीर होते. हिजबुल मुजाहिद्दीन, लष्कर-ए-तैयबा यांसारख्या संघटनांना पुढे नेण्यासाठी माजी दहशतवाद्यांना एकत्र करण्यासाठी अनेक ऑनलाइन प्रक्रियेत त्याचा सहभाग होता. दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल त्याला गेल्या वर्षी ४ ऑक्टोबर रोजी दहशतवादी घोषित करण्यात आले होते.

बशीर गेल्या आठवड्यात गुरुवारी नमाज अदा करण्यासाठी घराजवळील मशिदीत गेला होता. मशिदीतून बाहेर आल्यानंतर तो एका दुकानाजवळ उभा राहिला. दरम्यान, दोन हल्लेखोर दुचाकीवरून आले आणि त्यांनी बशीर यांची गोळ्या झाडून हत्या केली.

बशीर अहमद यांना इम्तियाज आलम या नावानेही ओळखले जात होते. जम्मू-काश्मीरमध्ये अनेक दहशतवादी घटना घडवण्यात त्याचा हात होता. हाजी, पीर आणि इम्तियाज या सांकेतिक नावाने तो जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी घटना घडवत असे. बशीर गेल्या काही वर्षांपासून रावळपिंडीत राहत होता. पाकिस्तान सरकारने त्यांना त्यांच्या देशाचे नागरिकत्व दिले होते.